# <u>प्रेसनोट</u>

नाशिक,
दि. ३०/०८/२०२२

**आलोसे प्रताप नागनाथराव वडजे, सहायक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळवण, जि. नाशिक यांना १०,०००/– रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | नाशिक |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | कळवण पोलीस स्टेशन, जि.नाशिक ग्रामिण गुरनं १७५/२०२२, दि.२९/०८/२०२२ |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | प्रताप नागनाथराव वडजे, सहायक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळवण, जि. नाशिक. |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | १०,०००/—रूपये |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | **१०,०००/—रूपये** |
| **थोडक्यात माहिती** | यातील फिर्यादी यांची पत्नी हया तताणी आश्रमशाळा, ता. सटाणा, जि. नाशिक येथे स्वयंपाकी म्हणुन कार्यरत होत्या. त्यांची स्वयंपाकी ऐवजी सफाईगार असे प्रकल्प अधिकारी यांनी काढलेल्या आदेशात नमुद करण्यात आले होते. त्यामुळे आलोसे प्रताप नागनाथराव वडजे, सहायक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळवण, जि. नाशिक यांनी फिर्यादी यांचे पत्नीचे सफाईगार पदनाम ऐवजी कामाठी किंवा स्वयंपाकी पदनामाचे नव्याने आदेश काढण्याचे मोबदल्यात फिर्यादी यांचेकडे **१०,०००/– रुपये** लाचेची मागणी केल्याने फिर्यादी यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br><br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान आलोसे प्रताप नागनाथराव वडजे, सहायक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळवण, जि. नाशिक यांनी फिर्यादी यांचेकडे **१०,०००/– रुपये** लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम पंच व साक्षीदार यांचेसमक्ष दि.२९/०८/२०२२रोजी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय कळवण येथे **स्विकारली** असता त्यांना पकडण्यात आल्याने त्यांचेविरुध्द कळवण पोलीस स्टेशन, जि.नाशिक ग्रामिण गु.र.नं. १७५/२०२२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे दि. २९/०८/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक
संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in
ई–मेल :– spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :– acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :– १०६४
दुरध्वनी क्रमांक :– ०२५३–२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स अॅपक्र :– ९९३०९९७७००

पोलीस उपअधीक्षक / पोलीस अधिक्षक अँटी करप्शन ब्युरो, नाशिक परिक्षेत्र, नाशिक

( सतिश भामरे )
वाचक पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक.